# दिनांक 19/03/2025

**1.** म्हसळा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 17/03/2025 रोजी 18:00 वा च्या सुमारास मौजे बंडवाडी गावचे हददीतील पांगळोली ते बंडवाडी जाणारे रोड लगत असलेल्या हुंबरवण्याच्या नावाच्या नाल्याजवळील सरुचे झाडा झुडपात ता.म्हसळा येथे कोणीतरी अज्ञात ईसमाने अज्ञात पुरुषाचा कोणत्यातरी अज्ञात कारणवरुन खुन करुन त्याचे प्रेत पोत्यात टाकुन तारेने बांधुन बंडवाडी गावचे हददीतील पांगळोली ते बंडवाडी जाणारे रोडलगत असलेल्या हुंबरवण्याचा नावाचा नाला या ठिकाणी पुरावा नष्ठ करण्याचे उददेशाने त्याचे प्रेत सरुचे झाडा जवळील झाडा झुडुपात फेकुन दिले. सदर गुन्ह्यातील आरोपीत यांना दिनांक वेळ 18/03/2025 रोजी 23:39 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत म्हसळा पोलीस ठाणे गुरनं.19/2025, भा.न्या. संहिता 2023 चे कलम 103, 238 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि/ श्री. संदीप कहाळे हे करीत आहेत.

**2.** दादर (सागरी) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 17/03/2025 रोजी 23:30 वा च्या सुमारास महीला फिर्यादी यांचे घरासमोर फिर्यादी व आरोपीत हे एका गावतले राहणारे असुन एकमेंकाच्या परिचयाचे आहेत. मौजे जिते गावामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळयाजवळ पडयावर पिक्चर लावला होता. परंतु फिर्यादी यांना सकाळी कामावर जाण्याचे असल्याने त्या घरी जात असताना गावामध्ये लाईट गेल्याने व फिर्यादी यांना अंधाराची भिती वाटत असल्याने त्यांनी मदती करिता गावातील त्याच्या ओळखीचे आरोपी यांना बोलाविले असता त्यांनी अंधाराचा फायदा घेवुन फिर्यादी यांना पाठीमागुन खांदयावर हात टाकुन पकडले व त्याचे हातातील घराची किल्ली व लाईट चालु असलेला मोबाईल घेउन आज मोका मिळाला आहे असे बोलुन घराचे कुलुप उघडुन दरवाजा उघडला. आरोपीत याने फिर्यादीचे स्त्री मनास लाज्जा उत्पन्न झाली नंतर झाला प्रकार फिर्यादी या आरोपीत याचे घरच्यांना सांगणेस गेले असता आरोपीत याने फिर्यादी यांचे थोबाडीत मारले.

याबाबत दादर (सागरी) पोलीस ठाणे गुरनं.10/2025, भारतीय दंड विधान (IPC) प्रमाणे (भाग VI) दाखल गुन्हे , भा.न्या.सं.कलम 74, 115(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोहवा/स्वप्नाली पाटील हे करीत आहेत.

**3.** नेरळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 17/03/2025 रोजी 18:20 वा च्या सुमारास मौजे भागुचीवाडी गावचे हददीत कर्जत मुरबाड रोड ता.कर्जत, येथे आरोपीत याने त्याचे ताब्यातील ब्रिजा कार क्र एम एच 05 एफ जी 0331 ही मुरबाड बाजूकडून कर्जत बाजुकडे भरधाव वेगात, हयगयीने रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून अतिवेगाने रॉंग साइटला चालवून त्यांचे समोरून कर्जत बाजूकडून मुरबाड बाजूकडे येणारी मोटार सायकल क्र. 1)एम. एच. 05 एफ. क्यू. 1569 व मोटार सायकल क्र. 2)एम. एच. 05 एफ. क्यू. 9489 या दोन्ही मोटार सायकलीस ठोकर मारून अपघात करून अपघातात एका मोटार सायकलची पाठीमागून येणा-या तिस-या मोटार सायकलला ठोकर लागल्याने अपघात होवुन सदर अपघातामध्ये पहील्या दोन मोटार सायकल वरील चार इसमांना लहान-मोठया स्वरुपाच्या दुखापती होवून त्यातील मोटार सायकल क्र एम. एच. 05 एफ. क्यू. 9489 वरील चालक धनाजी हनुमंत सोंगाळ याचे मरणास तसेच दोन्ही मोटारसायकल व स्वतःचे ताब्यातील ब्रिजा कारचे नुकसानीस कारणीभूत होवून अपघाताची खबर न देता पळून गेला.

याबाबत नेरळ पोलीस ठाणे गुरनं. 50/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184,134 , भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 106(1),281,125(a),125(b) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई रायसिंग वसावे हे करीत आहेत.

**4.** कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 18/03/2025 रोजी 09:30 वा च्या सुमारास मौजे वावळोली, पो.तिवरे, ता.कर्जत येथे फिर्यादी रा. .वावळोली, पो.तिवरे,ता.कर्जत यांचे चुलते आरोपित रा.वावळोली,पो.तिवरे ता.कर्जत हे फिर्यादी यांच्या बोरींगच्या शेजारी बाथरुमचा शोश खड्डा खोदत असल्याने त्या शोश खड्डयाचे पाणी बोरींगमध्ये जाईल म्हणुन त्यास त्या ठिकाणी शोश खड्डा खोदु नका असे फिर्यादी यांनी सांगीतले असता त्यांना त्या गोष्टीचा राग आल्याने त्यांनी फिर्यादी यांना शिवीगाळी दमदाटी करुन त्या ठिकाणी पडलेला दगड फिर्यादी यांच्या डोक्यात मारुन दुखापत केली.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं. 79/2025, भारतीय न्याय संहीता कलम 118(1), 352, 351(2), प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पो.हवा वडते हे करीत आहेत.

**5.** कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 18/03/2025 रोजी 09:30 वा च्या सुमारास मौजे वावळोली, पो.तिवरे, ता.कर्जत येथे फिर्यादी यांचे घराचे शेजारी फिर्यादी यांचे जागेत शोश खड्डा खोदत असताना फिर्यादी यांचा पुतण्या आरोपित क्र 01 व आरोपित क्र 02 हे तेथे आले व फिर्यादी यांना म्हणाले कि, त्या ठिकाणी शोश खड्डा खोदु नका त्याचे पाणी आमचे बोरींगमध्ये जाईल त्यावर फिर्यादी त्यांना म्हणाले कि, शोश खड्डा मी माझे जागेत खोदत असुन तुमची बोरींग खडयापासुन लांब आहे, शोश खडयाचे पाणी बोरींगमध्ये कसे जाईल, फिर्यादी हे आरोपीत क्रं.1 व 2 यांना बोलले असता त्या गोष्टीचा त्यांना राग आल्याने त्यांनी हाताबुक्यांनी मारहाण करुन शिवीगाळी दमदाटी केली व आरोपित क्र 01 याने त्या ठिकाणी पडलेला फावडा उचलुन त्या फावडयाने फिर्यादीचे नाकावर मरुन दुखापत केली.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं.80/2025, भारतीय न्याय संहीता कलम 118(1), 115(2) 352, 351(2),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पो.हवा वडते हे करीत आहेत.

**6.** खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक18/03/2025 रोजी 08:00 वा च्या सुमारास मौजे मुंबई- पुणे जुन्या हायवेवरील वावंढळ गावच्या हददीत ता. खालापुर येथे आरोपीत रा.जि. ठाणे यांनी त्याचे ताब्यातील होंन्डा ॲक्टीव्हा क्रमांक टी.एस.08 इ.पी. 4893 ही ठाणे ते वाफेघर, ता. सुधागड अशी चालवित घेवून जात असताना सदरची होंन्डा ॲक्टीव्हा ही हयगयीने, निष्काळजीपणे रस्त्याचे परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन चालवुन येवुन गाडी स्लिप होवुन रोडच्या खाली जावुन अपघात होवुन त्या अपघातात स्वत:चे श्री.विलास नारायण धावडे गंभीर दुखापत होवुन मरणास व स्वत:चे ताब्यातील वाहनाचे नुकसानीस कारणीभुत झाला.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुरनं.92/2025, भा.न्या.सं.2023 चे कलम 106 (1), 281 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोउपनिरीक्षक श्री. शिवाजी जुंदरे हे करीत आहेत.

**7.** पोयनाड पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 17/03/2025 रोजी 07:00 वा च्या सुमारास मौजे डबेवाडी व मेढेखार गावाच्या मध्ये नागोठणे पोयनाड रोडवर, अलिबाग येथे फिर्यादी यांचा लहान भाउ रा.वावे आदिवासीवाउी पो वडखळ ता. पेण हा दिनांक 17/03/2025 रोजी सायंकाळी 07.00 वाजताचे सुमारास त्याची दुचाकी मोटार सायकल नं एम.एच- 06/सी एन /5204ही घेवुन त्याची सासर वाडी कुसुंबळे आदिवासीवाडी येथुन वावे आदिवासीवाडी येथील घरी येत असताना नागोठणे पोयनाड रोडवरील डबेवाडी व मेढेखार गावचे मध्ये सरळ रस्त्यावर आरोपित रा. पोयनाड आदिवासीवाडी पो पोयनाड ता अलिबाग याने त्याचे ताब्यातील ईको गाडी नं एम.एच-06/सी एल /4502 ही घेवुन फिर्यादी यांचा भाउ मंगेश पवार हा जखमी झाल्याने त्यास उपचाराकरीता सिव्हील हॉस्पीटल अलिबाग येथे आणले असता अपघात विभागात डॉक्टरोनी त्यास रात्रौ 08.13 वाजता तपासुन तो उपचारापुर्वीच मयत असलयाचे घोषीत केले.

याबाबत पोयनाड पोलीस ठाणे गुरनं. 25/2025, bns 106(1),281,125(a)(b) ,, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री. सांगळे हे करीत आहेत.

8. रसायनी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 18/03/2025 रोजी 17:00 वा च्या सुमारास मौजे तळेगाव वाडी, ता. खालापूर येथे फिर्यादी रा. मौजे चांभार्ली ,ता. खालापूर व आरोपी क्र.1 - हे नात्याने पती-पत्नी असुन फिर्यादी यांचे पती यांनी दुसरे लग्न केल्याचे समजले असता ते विचारण्याकरीता फिर्यादी गेले असता आरोपीत याने बेकायदा मंडळी जमवून फिर्यादी यांना शिविगाळी करून हाताबुक्क्यांनी व मारहान करून फिर्यादीला दूखापत केली.

याबाबत रसायनी पोलीस ठाणे गुरनं.63/2025, BNS 189(3).191(2). 190. 115(2). 352.351(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/ सुशंक पिंगळे हे करीत आहेत.

9. रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 17/03/2025 रोजी 13:30 वा च्या सुमारास मौजे महिला फिर्यादी यांचे राहते घरात बेलोशी पो मल्याण, अलिबाग येथे फिर्यादी यांच्या अंगणात कोणीतरी दारूच्या 8 ते 9 रिकाम्या बाटल्या टाकल्या होत्या त्याबाबत फिर्यादी हया स्वतःच्या दारात बडबड करीत असताना त्या गोष्टीचा आरोपीत रा बेलोशी पो मल्याण ता अलिबाग याने मनात राग धरून आरोपीत क्र 1,2 व 3 यांनी आपआपसात संगनमत करून फिर्यादी यांचे घरात घुसुन फिर्यादी हिला काहीएक न विचारता उचलुन लादीवर आपटले व लाथाबुक्यांनी मारहाण करून घराच्या बाहेर आणुन आंब्याच्या झाडावर आपटले.

याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे गुरनं. 34/2025, भारतीय न्याय सहीता 2023 चे कलम 333, 115(2), 3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सफौ/दिनेश रामनाथ पिंपळे हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 18.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 317 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 3,01,450/-रुपये इतका दंड आकारला आहे.